**<u>नि. फौ. खटला क्र.५८/२०२०</u>**

**<u>निशाणी क्र.७०</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०४ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : मारोती तातेराव घोगरे,

**<u>वय</u>** : ३९ वर्षे, **<u>काम</u>** : शेती,

**<u>राहणार</u>** : गुरधाळ, ता. देवणी, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयामध्ये गैरहजर आहेत. (अर्ज नि.६९ वरील आदेशाप्रमाणे आरोपींची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दि.२४/०६/२०२० रोजी रात्री ९.०० वाजता बालाजी मिरकलेच्या घराजवळ आणि पाण्याच्या टाकीजवळ गुरधाळ येथे घटना घडली. मी माझी भावजय वर्षा हिला बोलवायला गेलो होतो. त्यावेळी आरोपी क्र.२ ते ४ यांनी मला शिवीगाळ केली आणि मारहाण केली. आरोपी वर्षाने माझ्या डोक्यावर कुऱ्हाडीने मारले. माझे वडील मला सोडविण्यासाठी आले असता आरोपी बालाजीने काठीने त्यांना मारले. माझे भाऊ, एकनाथ दौलत घोगरे, दत्ता दौलत घोगरे, माधव तात्याराव घोगरे यांनी मला लातूर येथील दवाखान्यात नेले. मी तेथे तीन दिवस भरती होतो. त्यानंतर मी पोलीस ठाणे देवणी येथे घटनेबाबत खबर दिली. आता मला खबर दाखविली. ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी ती वाचून दाखविल्यावर मी त्यावर सही केली होती. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.७१** देण्यात येते. मी नमूद कुऱ्हाड आणि बोरीची काठी बघितल्यास ओळखू शकतो. आता मला मुद्देमाल क्र.३/२०२६ मधील बोरीची काठी आणि कुऱ्हाड दाखविले. हे तेच आहेत. बोरीच्या काठीला **वस्तूचिन्ह अ** आणि कुऱ्हाडीला **वस्तूचिन्ह ब** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. भरत व्ही. पाटील यांच्यामार्फत ::</u>**

०२. माझे शिक्षण दुसरी पर्यंत झाले. आरोपी क्र.१ वर्षा ही माझ्या सख्ख्या

भावाची पत्नी आहे. आरोपी बालाजी हा माझ्या भावाचा सासरा आहे. आरोपी नामदेव हा माझ्या भावाचा मेव्हणा आहे. आरोपी दुशावंता ही माझ्या भावाची सासू आहे. शिवाजी दौलतराव घोगरे, एकनाथ दौलतराव घोगरे हे माझे चुलत भाऊ आहेत. तात्याराव घोगरे माझे वडील आहेत. सारीका माझी पत्नी आहे. खरबवाडी वरती आहे आणि गुरधाळ खाली आहे. माझ्या घरापासून मारोती मंदिरापर्यंत जाण्यास पाच मिनिटे लागतात.

०३. माझा भाऊ माधव आणि भावजय वर्षा हे मुंबई येथे राहत होते. आरोपी बालाजीने वर्षाला मुंबई येथून घरी आणले होते. त्यामुळे मी वर्षाला बोलावण्यासाठी गेलो होतो. वर्षाला मुलगी आहे. ती वर्षासोबत राहते हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर्षा माधवसोबत राहण्यास तयार नसल्याने मी तिला ओढून आणण्यासाठी गेलो होतो. बालाजीच्या घरापासून मारोती मंदिरापर्यंत जाण्यास पाच किंवा दहा मिनिटे लागू शकतात. हे म्हणणे खरे नाही की, बालाजीच्या घराच्या सभोवताली पाच–पंचविस घरे आहेत. गुरधाळ गावामध्ये दीडशे घरे आहेत.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे दि.२४/०६/२०२० रोजी कोणतीही घटना घडलेली नाही, आरोपींनी मला किंवा माझ्या वडिलांना मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर्षाने माधवकडे यावे यासाठी आम्ही सर्वांनी खोटी केस केली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.३०/०७/२०२६.